# भारतातील स्त्रीवादी चळवळ

**प्रा. डॉ. संजय पंढरीनाथ गायकवाड**

प्रमुख, राज्यशास्त्र विभाग स. भू. बा. उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे–०२

**सारांश:**

समूहाने रहाणे हा मानवप्राण्याचा स्वभाव आहे. एकत्र रहाताना तो आपले समाजसंबंध प्रस्थापित करतो. सामाजिक आंतरक्रियेमध्ये काही घटकांवर अन्यायही होतो परंतु जाणीवपूर्वक एखाद्या समाजघटकावर अन्याय करणे ही बाब समाजविघातक आहे. फस्ट्रेशन– अग्रेसन हायपोथेसीस सिद्धांताप्रमाणे समाजात अन्याय्य घटक म्हणजे अखील स्त्रीवर्ग. या वर्गाने चळवळीच्या साधनाचा वापर करून न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीने पुरुषाला स्थायित्व प्राप्त केले परंतु नंतर तोच पुरुष ताकदीच्या जोरावर स्त्रियांना गुलाम बनवत गेला. मनुस्मृतीला धर्मग्रंथाचे स्थान देऊन स्त्रीला गुलाम बनविले. अनेक अनिष्ठ प्रथांमध्ये ठेवून स्त्री प्रगती पूर्ण थांबविली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन करून हिंदू कोडबील आणले. या बिलाला समाजातीलच काही घटकांचा विरोध झालाशेवटी. बाबासाहेबांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. अनेक ग्रंथ आणि राज्यघटनेत विविध प्रकारच्या लिखित नोंदी करण्याबरोबरच गुलामाला गुलामीची जाणीव करून देण्यासाठी शिक्षण हे उत्तम हत्यार आहे. शिक्षणामुळेच स्त्रियांना जागृत करता येईल. आपल्या हक्कांची माहिती होईल आणि यासाठीच स्त्रियांच्या चळवळींची आवश्यकता आहे आणि स्त्रियांचा सन्मान केला, अधिकार दिले, स्वातंत्र्य दिले तरच समाजाची व देशाची मान उंचावेल.

**प्रस्तावना:**

पाश्चिमात्य देशांप्रमाणे भारतीय स्त्रीशोषण, अत्याचार, अपमान याशापांनी ग्रस्त आहे. आधुनिक शिक्षण घेतलेल्या आणि वैज्ञानिक प्रगतीचे अनेक टप्पे गाठलेल्या स्त्रियांच्या जीवनात प्रचंड मोठया प्रमाणात मानसिक संघर्ष आहे. स्त्रीला बाहेरच्या जगाबरोबरच आपल्या मानसिक संघर्षालाही स्त्रीला तोंड द्यावे लागत आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. भारतामध्ये राज्यकर्ता वर्ग स्त्रीला राजकीय जाणीव बनवू इच्छिते. लिंगभाव आणि स्त्रीप्रश्नांचे राजकारण हे याचेच उदाहरण आहे. भारतात पुरुषसत्ता आणि ब्राम्हणशाही ह्या स्त्रियांच्याशोषण करणाऱ्या संस्थांमध्ये भांडवलशाहीची भर पडली आहे. स्त्रियांना माणूसपण नाकारणाऱ्या मनुस्मृतीसारख्या संहिता आजही प्रभावी ठरत आहेत. भारतीय प्रसारमाध्यमेही स्त्रियांचे प्रश्न घेऊन केवळ चर्चा करताना दिसतात. भटके, विमुक्त, अल्पसंख्यांक, कामगार यांचे प्रश्न त्यांच्या त्यांच्या गटांनी सोडवावेत अगदी तसेच स्त्रियांचे प्रश्न स्त्रियांनीच सोडवावेत ही प्रवृत्ती आज बळावत चालली आहे. ऋग्वेद काळ, वसिष्ठ धर्मसूत्र, बौद्धकाळ, मनुस्मृतीपासून शेवटी डॉ. बाबासाहेबांचे हिंदू कोडबील या प्रत्येक स्थितीत स्त्रियांच्या समस्यांकडे कसे पाहिले गेले या घडामोडींचा संदर्भ घेऊनच नवसामाजिक चळवळींचा विशेषत: स्त्री चळवळीचा वेध घ्यावा लागेल. रामायण, महाभारतातील स्त्रियांच्या बाबतीतील उल्लेख,उदाहरणे आणि संदर्भ पाहून स्त्री समस्येची एक नवीन अन्वेष्ण पद्धती जन्माला येते. १९६० नंतर भारतामध्ये स्त्री प्रश्नांबाबत आधुनिकतेचे वारे वाहू लागले. स्त्रियांच्या रक्षणासाठी अनेक कडक कायदेही केले. तरीही प्रश्न निर्माण होतो तो मानसिक बदलाच्या प्रक्रियेचा.

**शीर्षशब्द:**

स्त्री चळवळ– मनुस्मृती– हिंदू कोडबील– नव सामाजिक चळवळ.

**विषय विवेचन:**

'फस्ट्रेशन– ॲग्रेशन हायपोथेसिस' या नावाने ओळखला जाणारा सिद्धांत जॉन डोलार्ड या अमेरिकन मानसशास्त्राने मांडला. त्याबाबत १९८० मध्ये डोलार्ड यांनी 'Frustration and Aggression' हा ग्रंथही प्रकाशित केला आहे. १९४० पासून यावर त्यांचे संधोधन सुरू होते. विविध प्राण्यांवरही त्यांनी प्रयोग केले यावरून ''राग हे नाराजी व्यक्त करण्याचे साधनआहे.'' आपल्याला जे हवे आहे ते मिळाले नाही की, आलेली नाराजी रागाच्या स्वरूपात व्यक्त होताना दिसते. माणूस असो अथवा प्राणी, हिंसा हा माणसाच्या सुप्त मनातील भाव आहे. प्रत्येक माणूस स्वत:ची जात, धर्म, पंथ, भाषा, लिपी, लिंग तसेच स्वत:चा परिवार इत्यादी गोष्टींशी जोडलेला असतो. राज्यशास्त्राचे जनक ग्रीक विचारवंत, तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल यांनी 'Politics' नावाचा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. त्यांचा एक विचार प्रसिद्ध आहे ते म्हणतात, 'मनुष्य हा समाजशील प्राणी आहे' मनुष्याला समाजामध्येच राहायला आवडते. तो मानवी समूहापासून दूर राहूशकत नाही. तो समाजात जन्म घेतो. समाजावर अवलंबून राहातो आणि त्याचाशेवटही समाजातच होतो. समाजामध्ये त्या माणसाचे इतर सर्वांशी अथवा काहींशी संबंध प्रस्थापित होतात. अनुकूल–प्रतिकूल

असे दोन्ही प्रकारचे संबंध निर्माण होतात. माणसाला विरोध झाला मग त्याची कृती असो की विचार तो माणूस अस्वस्थ होतो. अस्वस्थ होतो म्हणजे तो रागावतो आणि जॉन डोलार्ड यांनी म्हटल्याप्रमाणे माणूस चिंताजनक प्ररिस्थितीत त्याची नाराजी निर्माण करतो. ही नाराजी मग रागाच्या रूपात व्यक्त होते. तो व्यक्त होताना दुसऱ्यांना इजा करतो, मारतो. थोडक्यात माणूस 'हात साफ' करून घेतो अशी हिंसा माणसाच्या मनातील सुप्त भाव आहे. प्राणीसुद्धा आपली नाराजी व्यक्त करताना, राग व्यक्त करताना हिंसक बनतात.

मानव आपल्या जीवावर आलेल्या संकटापासून दूर जाण्याचा किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करतो, मात्र आपणास पळून जाता येत नाही किंवा बचाव करण्याचा मार्ग बंद झाला की मग तो आक्रमक होतो. अस्वस्थ होऊन तो परिस्थितीशी सामना करतो, स्त्रियांच्या बाबतीही हे निरीक्षण नोंदविता येईल.

**स्त्री चळवळ– पार्श्वभूमी:**

माणसाच्या विकासक्रमात संशोधकाने जसा निसर्गशक्तींचा अभ्यास केला तसा माणसाचाही अभ्यास केला. माणूस एकेकाळी भटका होता परंतुशेतीच्याशोधाने त्याच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन केले आणि या कार्यात स्त्रियांचा पुढाकार होता हे इतिहास सांगतो. तो स्थिर झाला शेतजमिनीवर बैठे काम करू लागला. शेती विकासासाठी त्याने जंगलतोड सुरू केली. शेतीमधून त्याला कार्ल मार्क्सच्या परिभाषेत 'वरकड' उत्पन्न मिळू लागले. यातूनच समाजवर्गीय बनला. जुनी मातृसत्ता कालबाह्य ठरण्यास येथूनच सुरूवात झाली. स्त्री–पुरुषाचा वर्ग निर्माण होऊन पितृसत्ताक पद्धती रूजण्यास सुरूवात झाली. स्त्रीला गुलाम बनविण्याचा आणि पिळवणूक करण्याच्या 'कले'चाशोध येथेच लागला. स्त्री–पुरुष सामाजिक प्रक्रियेचे घटक असूनही विकासक्रमातील हा टप्पा महत्त्वाचा होता. हा सर्व मानवी, सामाजिक आणि राजकीय विकासक्रम कसा घडला याचा तपशील आपणास महाभारत हे इतिहासकाव्यही देते. सदरच्या विकासक्रमातील राज्य निर्मितीच्या टप्प्यावर समाजधारणेला नवे रूप देणारे एक नवे धर्मशास्त्रही जन्म घेत असते. भारतीय इतिहासात धर्मशास्त्रालाच राज्याची राज्यघटना मानली असेही घडलेले आहे. भारतासाठी मनुस्मृती हे एक शास्त्र बनले होते.

वेद काळातील 'मुक्त' स्त्री, की जी स्त्री पुरुषांबरोबर धर्म, तत्त्वज्ञान, विश्वाची उत्पत्ती इत्यादी बाबतीत वादविवाद करत होती. तिला 'मनुस्मृती'मुळे दुय्यम स्थान प्राप्त झाले. जीवनातील विकास, श्रमविभागणी, स्त्री–पुरुष संबंधाचे बदलते स्वरूप अशा अनेक कारणांमुळे स्त्री गुलाम बनत गेली. स्त्री ही पुरुषाची खाजगी मालमत्ता मानली गेली. पुढे पुरुषप्रधान संस्कृती तयार झाली. बालविवाह, सतीची चाल, विधवा केशवपन अशा अनिष्ठ प्रथा परंपरा निर्माण झाल्या. मुलगी म्हणजे परक्याचे धन अशी मानसिकता झाली अशा अवस्थेतही राणी लक्ष्मीबाई, ताराबाई, चांदबिबी, रझिया सुलतान यांसारख्या अनेक स्त्रीयांनी केलेला संघर्ष उल्लेखनीय आहे.

फस्ट्रेशन–अग्रेशन हायपोथेसिस या सिद्धांताप्रमाणे स्त्री वर्ग वेदकाळात सुखी, आनंदी, विविध विषयामध्ये चर्चा, संघर्ष करणारा असा होता परंतु मनुस्मृतीमुळे त्यांना त्यांच्यातील राग व्यक्त करण्याची सोय नव्हती. स्त्रीला जे हवे आहे (स्वातंत्र्य) ते मिळत नव्हते. नंतरच्या प्रबोधन चळवळींमुळे स्त्रीवर्गाची प्रतिकूलता आणि नाराजी चळवळींच्या निर्मितीच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसते. प्रबोधन चळवळींमुळे पुरुषांच्यामध्ये राहून त्यांच्याच विरोधात दंड थोपटून उभे राहण्याची ताकद निर्माण झाली. स्त्रियांची अस्वस्थता चळवळीच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसून येते.

**मनुस्मृती ते हिंदु कोडबील:**

हिंदू स्त्रियांच्या अवनतीसाठी मनुस्मृतीमध्ये जे कायदे तयार केले होते त्याविषयीची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ''हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती'' या पुस्तिकेत दिली आहे. स्त्रियांना स्वतंत्रपणे वागण्याची परवानगी नाकारणाऱ्या मनुस्मृतीने मुलीने लहानपणी वडिलांच्या, तरुणपणी पतीच्या आणि पतीच्या मृत्यूनंतर मुलाच्या आज्ञेतच राहिले पाहिजे, पत्नीने पतीच्या आज्ञेतच राहिले पाहिजे, जरीही पतीने पत्नीला आपल्यापासून विभक्त केले, तिचा त्याग केला तरीही ती मनुस्मृती कायद्यानुसार विभक्त होणार नाही. परमेश्वर मानूनच पत्नीने पतीशी वागले पाहिजे. कुटुंबाच्या मालमत्तेवर स्त्रीचा हक्क आणि अधिकार नाही. एवढेच नव्हे तर ज्ञान मिळविण्याचाही अधिकार तिला नाही. वैदिक मंत्र, पुजा–अर्चा, यज्ञविधी करता येणार नव्हता अशा प्रकारे मनुस्मृतीने सर्व क्षेत्रातून स्त्रियांचे अस्तित्व संपवून टाकले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सदरची पुस्तिका लिहून स्त्रीला 'चूल आणि मूल' या बंधनातून मुक्त केले. तसेच बाबासाहेबांनी 'भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म' या महान ग्रंथाची निर्मिती करून स्त्रियांना 'पुरुषाची दासी' या भूमिकेतून बाहेर काढले. प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करावे. मात्र गुलामाप्रमाणे वागण्यास खंबीरपणे नकार द्यावा. या ग्रंथातून बाबासाहेबांनी समतेसाठी आग्रह धरला. पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ ही भावना नष्ट करून स्त्री–पुरुष समानतेचा एक नवा दृष्टिकोन समाजाला दिला. यासाठीच

तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले. त्यामुळे स्त्री उन्नती खऱ्या अर्थाने २५ डिसेंबर १९२७ पासूनच सुरू झाली असे म्हणावे लागेल. स्त्रियांवरील अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी केवळ उपदेशपर भाषणे दिली नाहीत तर स्त्रियांत अमुलाग्र बदल व्हावा, नवचैतन्य निर्माण करण्यासाठीच मनुस्मृतीचे दहन केले हे महत्त्वाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री असताना हिंदु कोडबीलाचे चार निरनिराळे भाग करून तेवढे कायदे तयार केले. उदा. १) हिंदु विवाह कायदा २) हिंदु वारसा कायदा ३) हिंदु अज्ञान व पालकत्व कायदा ४) हिंदु दत्तक व पोटगी कायदा अशा चार कायदा संहिता तयार केल्या यालाच हिंदु कोडबील असे म्हटले गेले. 'The Rise and fall of Hindu Womens'या लेखातही बाबासाहेबांनी प्राचीन काळातील स्त्री गुलामीत कशी गेली, तीशोषित कशी बनली तसेच नंतर फुले दांपत्यांनी शिक्षणाची दारे स्त्रियांसाठी उघडली. महाडच्या मनुस्मृती दहनाने आणि ११ एप्रिल १९४७ रोजी संविधान सभेत हिंदु कोडबील मांडून स्त्री–पुरुष समानता पुन:स्थापित केली. अर्थात हिंदु कोडबीलासंबंधी विविध मतमतांतरे असताना सर्व बाजूंनी हिंदु कायद्यात जास्तीत जास्त स्त्रियांच्या हिताचा विचार मांडला आहे. मात्र हे कोडबील नामंजूर केले गेले. दोन वर्षे रात्रंदिवस जिवापाड मेहनत करून हे बील तयार केले होते आणि त्याचाशेवट असा व्हावा हे पाहून आंबेडकरांना वाईट वाटले म्हणून त्यांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. सामाजिक हितासाठी विशेषत: स्त्रियांना स्वतंत्र करण्याची उर्मी बाळगून राजीनामा देणारे हे पहिलेच मंत्री असावेत. अखेर काही फेरबदल करून हिंदु कोडबील मंजूर केले. असाही मतप्रवाह आहे की जर बाबासाहेबांनी तयार केलेले हिंदु कोडबील आहे तसे मान्य व मंजूर केले असते तर आज हा निबंध लिहिण्याची गरजही पडली नसती.भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांना अनेक अधिकार दिले. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांपासून पंतप्रधान व राष्ट्रपती पदापर्यंत स्त्रिया पोहोचल्या. वैमानिक, रेल्वेचालक, गिर्यारोहक पर्यंत जाऊन पोहोचल्या. स्पर्धा परीक्षा देऊन अतिमहत्त्वाची प्रशासकीय पदे काबीज केली आहेत.

**स्त्री आणि नव–सामाजिक चळवळ:**

समाजाचा एक घटक असलेल्या स्त्रीला अन्याय सहन करावा लागला. इतिहासात तिला मानाचे स्थान मिळू शकले नाही. उपेक्षा आणि मानभंग जणू त्यांच्या पाचवीला पुजलेले होते. एकोणीसाव्याशतकात भारतात वैचारिक जागृती होऊ लागली, शिक्षण प्रसाराचे महत्त्व वाढू लागले. राज्यघटनेतील समतेसारख्या अनेक तरतुदींच्या आधारावर नवी समाजव्यवस्था निर्माण करण्याचे महत्त्व 'दूरदृष्टी' असलेल्या नेत्यांच्या लक्षात आले ह्या प्रश्नाला दुसरीही बाजू होती. भारतात हळूहळू स्त्री चळवळीचे वारे वाहू लागले. स्त्री वर्गाने संघटित होऊन अन्यायास प्रतिकार करण्याची भाषा बोलली जाऊ लागणे अशी प्रतिकाराची भाषा समकालीन युगात बोलण्याची आवश्यकता पडणे हे काही भूषणावह नाही. स्त्री चळवळ निर्माण होणे हीच मुळात पुरुषांच्या नाकर्तेपणाची बाब मानावी लागेल. समकालीन युगात स्त्रियांच्या चळवळी निर्माण होणे म्हणजेच स्त्रियांना समाजव्यवस्थेतील एक घटक म्हणून समाज व्यवस्थेने त्यांचा अधिकार नाकारणे होय. स्त्रियांना पुरुषांच्याबरोबरीने समान हक्क मिळविण्याचा उद्देश या चळवळींचा आहे. स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागले, संघर्ष करावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या माध्यमातून पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार बहाल करून भारतीय स्त्रियांचा सन्मान वाढविला आहे.

आजही एकविसाव्याशतकात स्त्रियांवरील अत्याचार कमी झाले नाहीत. स्त्री–भ्रूणहत्या ही मोठी समस्या बनली आहे. स्त्रियांचे आजचे संसदेतील प्रमाण पाहिले तर भारतीय समाजाची आणि त्यांच्या राजकीय दूरदृष्टीची अनुभूती येते. स्त्रियांच्या समस्यांवर स्त्री अत्याचाराविषयी केवळ चर्चा होते; निष्पन्न मात्र काही होत नाही. हे १९५२ पासून ते २०२० पर्यंतची परिस्थिती सांगते. मुले न होणे, लग्नच न होणे यासाठीसुद्धा अघोरी कृत्यांना व प्रथांना सामोरे जावे लागते. हा अनुभव स्त्रियांना नित्याचा झाला आहे. शहरी भागातील झोपडपट्टी, खेडेगावातसुद्धा स्त्रियांना मुलभूत सुविधा मिळत नाहीत. पुण्यासारख्या पुढारलेल्या आणि विद्येचे माहेरघर असणाऱ्याशहरात पुरुषांच्यासाठी स्वच्छतागृहे किती आहेत आणि स्त्रियांसाठी किती स्वच्छतागृहे आहेत याकडे जरी लक्ष दिले तरी समाजाची मानसिकता स्त्रियांसाठी अनुकूल आहे की प्रतिकूल हे लक्षात येते. ग्रामीण भागात तर आहेच पणशहरी भागातही तिला अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. या लढयात यशस्वी व्हायचे असेल तर स्त्री चळवळीला छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपतीशाहू महाराजआणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या अनेक विभूतींच्या विचारांचे बळ घेऊन लढावे लागेल.

**निष्कर्ष:**

चळवळ ही सातत्याने चालणारी गोष्ट आहे. भारतामध्ये आज अनेक ज्वलंत समस्या निर्माण होत आहेत. त्यातील महत्त्वाची समस्या आहे ती स्त्री चळवळीची. एखाद्या विषयाची स्त्रीवादी मांडणी करणे म्हणजे केवळ

स्त्रियांच्या कार्यकतृत्वाची गोळाबेरीज नसून त्यांच्या कार्यकतृत्वामधील अडथळ्यांची कारणेशोधणे, स्त्रियांना दुय्यमत्व का प्राप्त झाले याची कारणमिमांसा करणे हे होय. समाजातील स्त्री वर्गाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पारतंत्र्यातून मुक्त करण्याची मानसिकता निर्माण होणे म्हणजेच स्त्रियांना न्याय देणे होय. स्त्रियांना आज 'अस्पृश्य' जीवन जगावे लागत आहे ही बाब निश्चितच अन्याय्य आहे. समाजमन बदलले तरच स्त्रियांची मुक्ती होऊशकेल. स्त्रियांची जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीकोनाबरोबरच अखिल पुरुष वर्गात देखील स्त्रियांबद्दल नकरात्मक दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. यासाठीच तर स्त्रियांच्या सामाजिक समतेसाठी चळवळी उभ्या राहिल्या. स्त्री वर्गात जागृती झाली तरच तिचा उद्धार होईल व समाजाचीही प्रगती होईल आणि हे सर्व होण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीचा प्रत्यय येतो. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे स्त्री चळवळ हे स्त्रियांच्या नाराजीचे साधन आहे. चळवळीद्वारे स्त्रिया आपली नाराजी व्यक्त करतात आणि रागाच्या स्वरूपात व्यक्तही होताना दिसतात.

जॉन डोलार्ड यांच्या फस्ट्रेशन–अग्रेशन हायपोथेसिस या सिद्धांताप्रमाणे स्त्रियांवर होणारा अन्याय अगोदर तीशक्य होईल तोपर्यंत सहन करते. ती तिचा राग चळवळीच्या माध्यमातून व्यक्त करूनही योग्य मार्ग सापडला नाहीच तर ती हिंसा हा मार्ग स्वीकारते. म्हणजेच परिस्थितीशी सामना करते. स्त्री सुद्धा आपल्या सामाजिक घटकाचाच एक महत्त्वाचा भाग आहे, अनेक दृष्टींनी आणि कारणांनी स्त्री सामाजिक प्रक्रियेशी जोडली गेली आहे. पुरुष संस्कृतीमध्ये तिचा बचाव करण्याचा मार्गच बंद केल्यामुळे स्त्री जास्त आक्रमक बनली आणि ही बाब बिल्कुलच स्वाभिमानाची नाही. एकूणच आजच्या सुधारणावादी आणि परिवर्तनवादी चळवळीत तसेच प्रबोधनात स्त्रियांच्या प्रश्नांना अग्रस्थान अपेक्षित आहे.

**संदर्भ:**

१. पाटीलशरद, प्रिमिटिव्ह कम्युनिझम मातृसत्ता, स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद, मावळाई प्रकाशन, शिरूर, पुणे, २०१२.
२. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र.
३. कसबे रावसाहेब, मानव आणि धर्मचिंतन, सुगावा प्रकाशन, पुणे.
४. पुरोहित नंदकुमार, वेश्या व्यवसाय लैंगिक अत्याचारच आहे, सुगावा प्रकाशन, पुणे, २००५.
५. डाहाट धनराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर– भाषणे आणि विचार, खंड १, स्त्री, संकेत प्रकाशन, नागपूर, डिसेंबर २०११.
६. आंबेडकर बाबासाहेब, हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती, सुगावा प्रकाशन, पुणे.
७. सरदेसाई पौर्णिमा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर– स्त्रियांच्या हक्कांची सनद, Research Journey, Feb 2019.
८. गायकवाड संजय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ संशोधन प्रबंध, मार्क्स–आंबेडकर समन्वयवाद आणि समकालीन राजकारण २०१६.

___________